## महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळ मर्या., मुंबई
## महामंडळाची संक्षिप्त माहिती

- महामंडळाची स्थापना दिनांक २७/०३/२००२ रोजी झाली आहे. राष्ट्रीय विकलांग वित्त व विकास महामंडळाची प्राधिकृत वाहिनी म्हणून महाराष्ट्र राज्य दिव्यांग वित्त व विकास महामंडळास मान्यता दिलेली आहे.
- या महामंडळाचे नोंदणीकृत कार्यालय - रूम नं.७४, तळमजला, गृहनिर्माण भवन (म्हाडा) वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०००५१ येथे आहे.
- राज्यातील १८ ते ६० वयोगटातील दिव्यांगांना स्वयंरोजगारासाठी कर्ज स्वरूपात अर्थसहाय्य करण्याचे कार्य या महामंडळाकडे सोपविले आहे. सदरहू योजनेचा उद्देश मुख्यत्वेकरून कमी भांडवलात व्यवसाय सुरु करणे शक्य व्हावे हा आहे.
- मा. मंत्री, दिव्यांग कल्याण विभाग हे या महामंडळाचे पदसिध्द अध्यक्ष आहेत व मा. राज्यमंत्री, दिव्यांग कल्याण विभाग हे या महामंडळाचे पदसिध्द उपाध्यक्ष आहेत. तसेच इतर सदस्य म्हणजेच सचिव, दिव्यांग कल्याण विभाग, व्यवस्थापकीय संचालक, राष्ट्रीय विकलांग वित्त एवम् विकास निगम, नवी दिल्ली किंवा त्यांचा प्रतिनिधी, आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे व ४ अशासकीय सदस्य (ज्यांची निवड राज्यशानामार्फत करण्यात येईल) हे सदस्य दिव्यांग क्षेत्रातील संघटनाशी संबधित असतील. यामध्ये अंध, मुकबधीर, अस्थिव्यंग व मतिमंद या दिव्यांगाच्या संवर्गातील किमान १ सदस्य असावा हे संचालक आहेत. तसेच महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक हे सदस्य सचिव आहेत.
- महामंडळाचे अधिकृत भागभाडंवल **रक्कम रू. ५०० कोटी एवढे आहे. या महामंडळास स्थापनेपासून रक्कम रू. १०५.९२ कोटी एवढे भागभांडवल प्राप्त झाले आहे.**
- दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी होण्याच्या दृष्टीने हरित उर्जेवर चालणाऱ्या पर्यावरणस्नेही फिरते दुकान (मोबाईल शॉप ऑन व्हेईकल) या योजने अंतर्गत सन २०२१-२२ या वर्षात रक्कम रू. २.५० व सन २०२२-२३ या वर्षात रु.१२.२५ कोटी व सन २०२३-२४ या वर्षात रु.५ कोटी अशाप्रकारे एकुण रु.१९.७५ कोटी या महामंडळास प्राप्त झाले आहेत.
- सन २०२३-२४ या आर्थिक वर्षासाठी केलेली योजना व योजनेअंतर्गत केलेली तरतूद खालीलप्रमाणे आहे -

| अ.क्र. | लेखाशिर्ष | तरतूद | प्राप्त निधी | अप्राप्त निधी |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| १ | अर्थसंकल्पीय तरतूद | | | |
| | वेतन | ९५.६४ लाख | ७६.४२ लाख | -- |
| | वेतनेत्तर | ९०.२१ लाख | १८.०४ लाख | ७२.१७ लाख |
| २ | भागभांडवलीय अनुदान | ७.०० कोटी | १.४० कोटी | ५.६० कोटी |
| ३ | हरित ऊर्जेवरील चालणाऱ्या पर्यावरणस्नेही वाहनावरील दुकान योजना | १५.०० कोटी | ५.००कोटी | १०.०० कोटी |

- या महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या योजना :-
- **राज्य शासनाच्या थेट कर्ज योजने** अंतर्गत रक्कम रू. ५०,०००/- २% व्याजदराने ३ वर्षाकरीता कर्ज वितरीत करण्यात येते.
- **राष्ट्रीय महामंडळाची दिव्यांग स्वावलंबन योजनेअंतर्गत रक्कम रू. ५०,०००/- ते १० लाखापर्यंत ५% ते ९% व्याजदराने ५ वर्षाकरीता कर्ज वितरीत करण्यात येते.**
- दिव्यांग व्यक्तींना स्वावलंबी होण्याच्या दृष्टीने **हरित उर्जेवर चालणाऱ्या पर्यावरणस्नेही फिरते दुकान (मोबाईल शॉप ऑन व्हेईकल)** राज्य शासनाची योजना या महामंडळामार्फत राबविण्यात येत आहे.

- राज्यातील अल्प उत्पन्न गटातील गरजू व्यक्तींना कृत्रिम अवयव व सहाय्यक साधने उपलब्ध करून देण्याकरीता **जिल्हा नियोजन समिती योजनेअंतर्गत** दिव्यांग व्यक्तींची तज्ज्ञांकडून तपासणी करून आवश्यतेनुसार Hi-Tech **कृत्रिम पाय (जयपूर फूट), कॅलीपर्स व कृत्रिम हात** इत्यादी सहाय्यक उपकरण यांचे वाटप जिल्हा नियोजन समितीमार्फत प्राप्त निधीतून करण्यात येते.
- या महामंडळाकडून **राष्ट्रीय व राज्य शासनामार्फत** राबविण्यात येणाऱ्या योजनेअंतर्गत **एकूण १४५५३ लाभार्थ्यांना रक्कम रू. १२७.१५ कोटी** एवढे कर्ज वितरीत करण्यात आलेले आहे.
- या महामंडळास स्थापनेपासून राष्ट्रीय महामंडळ, नवी दिल्ली यांचेकडून शासन हमीआधारे प्राप्त मुदती कर्ज व शैक्षणिक कर्ज निधीचा तपशील खालीलप्रमाणे आहे
  - राष्ट्रीय महामंडळ, नवी दिल्ली यांचेकडून प्राप्त निधी- रु.१४०.२८ कोटी
  - लाभार्थींना कर्ज वितरीत केलेली रक्कम - ११४.०९ कोटी
  - लाभार्थी संख्या-१०५४४
- वैयक्तीक थेट कर्ज योजनेतंर्गत
  - महामंडळामार्फत वितरीत केलेली रक्कम - रु.८.०२ कोटी
  - लाभार्थी संख्या-४०२०
- या महामंडळास स्थापनेपासून शासनाकडून रक्कम रू. १७५ कोटी एवढी शासन हमी प्राप्त झाली आहे.